# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १८/०८/२०१८

## मा. स्थायी समिति सभा

## सभा सूचना क्र. ०६

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ..........................................
स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २४/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २४/०८/२०१८ सभा सुचना क्र. ०६ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | मागील सभांचे इतिवृत्तांत - निरंक |
| --- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| --- | विनंती अर्ज – निरंक |
| --- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव – निरंक |
| --- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| ६४ | मा. आयुक्त सो. यांचेकरीता नविन वाहन खरेदी करणेबाबत. |
| ६५ | बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नळजोडणी मंजूर करणेसाठी धोरण ठरविणेबाबत. (मा. स्थायी समिती दि. १६/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ४५) |
| ६६ | श्री. दादासाहेब खेत्रे, विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग यांच्या अपिलीय अर्जावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती दि. १६/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५१) |
| ६७ | श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांच्या अपिलीय अर्जावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती दि. १६/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५२) |
| ६८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण २ कलम २० पोटकलम (४) अन्वये मा. स्थायी समितीचे निम्मे (आठ) सदस्य चिठ्ठया टाकुन निवृत्त करणेबाबत. |
| ६९ | विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| --- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे |
| --- | समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

दिनांक :- १८/०८/२०१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.स्थायी समिती सभा**

**दि. /०८/२०१८**
२४/०८/२०१८

**।। गोषवारा ।।**

**प्रकरण क्र. ६४ :- मा. आयुक्त सो. यांचेकरीता नविन वाहन खरेदी करणेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त सो. यांना महानगरपालिका कार्यालयीन कामकाजाकरिता मनपा क्षेत्रातील विविध विकास कामांवर देखरेख करणे, मनपा क्षेत्रातील पदाधिकारी/नगरसेवक/नागरिक यांच्या समस्या सोडविणे, जिल्हाधिकारी ठाणे तसेच विविध शासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता भेटी देणे, कार्यालयीन कामकाजाकरिता मंत्रालय, मुंबई व कोकण भवन येथे जाणे उपरोक्त ठिकाणी वेळेत पोहचणे गरजेचे असते. परंतु वाहना अभावी वेळेवर कार्यालयीन कामकाज करणे अडचणीचे होणार असल्याने वाहन उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे.

मा. आयुक्त सो. यांना यापुर्वी वाहन क्र. एमएच.०४.एएन.९०९९ (टाटा मांझा) हे वाहन वापरात होते. सदरचे वाहन २०११ मध्ये खरेदी केलेले असुन वाहनास ७ ते ८ वर्ष झालेली असुन हे वाहन नादुरूस्त होत आहे.

शासन निर्णय क्र. वाहन/२०१४/प्र.क्र.-३६/१४/विनियम दि. २२/०८/२०१४ अन्वये निर्लेखित केलेल्या वाहनांच्या एकूण संख्येच्या ७५% वाहन खरेदी करणेबाबत मान्यता आहे. महानगरपालिकेने सन २०१७-१८ या वर्षात एकूण ११ वाहने निर्लेखित केलेली आहेत. सदर शासन निर्णयानुसार निर्लेखित वाहनांच्या बदल्यात मा. आयुक्त सो. यांना नविन वाहन खरेदी करणे शक्य होईल. सन २०१८-१९ अर्थसंकल्पात **" नविन वाहन खरेदी "** या लेखाशिर्षात रू. १०.०० लाख इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी मारुती कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून मारुती सियाज (पेट्रोल) नविन वाहन शासन मर्यादेनुसार खरेदी करणे योग्य होईल सदर वाहन खरेदी करीता सन २०१८-१९ मधील अंदाजपत्रकात **नविन वाहन खरेदी या लेखाशिर्षात १०.०० लाख इतकी तरतूद** करण्यात आलेली आहे. सदर तरतुदी मधुन जेम ई मार्केटिंग पोर्टल यांचे मार्फत थेट वाहन खरेदी करणेस मा.स्थायी समितीची प्रशासकिय व वित्तीय मंजुरीस शिफारस असे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

**उप आयुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

C:\Users\Desktop\goshwara 2018-19 vahan kharedi.docx

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. स्थायी समिती सभा दि.२४/ ०८/२०१८.

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ६८ :- विविध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) प्रभाग समिती क्र.०१ व ०२ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.
(अंदाजित रक्कम रु. १,५०,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २.५०% जास्त दराने<br>वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने |
| २) मे. गणेश डेव्हलोपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ६.००% जास्त दराने |

२) प्रभाग समिती क्र.०३ व ०४ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.
(अंदाजित रक्कम रू. १,५०,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) मे. गणेश डेव्हलोपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ४.५०% जास्त दराने<br>वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने |
| २) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ५.९९% जास्त दराने |

३) प्रभाग समिती क्र.०५ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.
(अंदाजित रक्कम रू. १,५०,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) मे. गणेश डेव्हलोपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ४.५०% जास्त दराने<br>वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने |
| २) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ६.२५% जास्त दराने |

४) प्रभाग समिती क्र.०६ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरिता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे.
(अंदाजित रक्कम रू. १,५०,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) मे. विंध्या ट्रेडर्स | **अंदाजपत्रक दरापेक्षा २.३०% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १.००% जास्त दराने** |
| २) मे. गणेश डेव्हलोपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ६.००% जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व ४ च्या कामांकरीता **विंध्या ट्रेडर्स** व अ.क्र. २ ते ३ च्या कामांकरीता **मे. गणेश डेव्हलोपर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका
२०/८/१८

गोषवारा प्राप्त दि. २९/०८/२०१८ वेळ ११.५०
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ४३
लिपीक २९/८/१८
नगरसचिव विभाग.

D:\E DRIVE DATA\Rane\Goshwara 2018-19\Goshwara - Nivida Manjuri - 18-02 to 18-05.doc